<u>रेग्युलर कज्जा क्रं.१५०/१९९८ मधील निशाणी ९८ वरील आदेश</u>.
**(CNR NO.MHKO07-000105-1998)**

१. प्रस्तुत अर्ज वादीने या दाव्याच्या कामी सी.पी.सी. ऑर्डर १८ रुल ३(अ) प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रस्तुत दावेत वादी नं.९ यांचा सरतपास व उलटतपास नि.४६ ला झालेला आहे. याकामी वादी यांनी नि.७८ ला वादी नं.२ यांना साक्षीदार म्हणून तपासण्याची परवानगी मिळावी असा अर्ज दिलेला होता तो दि.२२.०८.२०१४ ला मंजूर करण्यात आला. त्यानंतर वादीने वरील साक्षीदार यांना कमिशनवर तपासण्यात परवानगी मिळावी म्हणून नि.७३ अर्ज दिला होता तोही मंजूर झाला. तद्नंतर वादी नं.२ हे दि.२१.१२.२०१७ रोजी नांदणी येथे मयत झाले आहेत. त्यामुळे नि.७८ प्रमाणे झाले आदेशाप्रमाणे त्यांना साक्षीदार म्हणून कमिशनवर तपासण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. वादी नं.९ नंतर याकामी माहितगार ट्रस्टी वादी क्रं.७ श्री.शशिकांत कलगोंडा पाटील हे आहेत. ते सन २००१ पासून वादी नं.१ चे ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून काम पाहतात या दावेच्या विषयी संबंधी आवश्यक सर्व माहिती वादी नं.७ यांनाच आहे. विशेषतः वादी नं.२ स्वस्तीश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांच्या मृत्यूनंतर वादी ट्रस्टच्या सर्व व्यवहाराची वादी नं.२ हे हयात असताना व त्यांच्या मृत्यूनंतर सर्व माहिती वादी नं.७ यांनाच आहे. वादी नं.७ यांना वादी तर्फे साक्षीदार म्हणून याकामी तपासण्यास परवानगी मिळावी.

३. प्रतिवादी तर्फे वादी यांचे अर्जास नि.१०३ कडे आपले म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे असे की, वादीचा सी.पी.सी.१८ रुल ३(अ) प्रमाणे वादी नं.७ यांना साक्षीदार म्हणून तपासणेस परवानगी मागणेचा अर्ज हा खरा व प्रामाणिकपणाचा नाही. यापूर्वी सर्व वादी तर्फे नेमले मुखत्यार वादी नं.९ रावसाहेब सिध्दाप्पा सुर्यवंशी यांनी वादी नं.१ ते ८ व १० यांचेसाठी वटमुखत्यार म्हणून पुरावा दिला आहे. त्यासाठी सर्व इतर वादींनी मिळून वादी नं.९ यास वटमुखत्यार दिले आहे. त्यामुळे वादी नं.७ यास पुन्हा वादी तर्फे साक्षीदार म्हणून तपासणेस परवानगी देता येणार नाही. वादीच्या माहितीप्रमाणे वादी नं.७ श्री.शशिकांत कलगोंडा पाटील हे

प्रस्तूतच्या दाव्यानंतर विश्वस्त म्हणून सन २००० साली आलेले आहेत. त्यामुळे त्यांना पूर्वीची माहिती त्यांना असणे शक्य नाही. तत्पूर्वी मठाचा व त्यांचा काहीही संबध नव्हता. तसेच यापूर्वी वादी नं.९ यांचे सर्व वादी तर्फे झालेला जबाब हा सर्व वादींचे वतीने मुखत्यारधारक या नात्याने रेकॉर्डवरील सर्व कागदपत्रे पाहून व इतर सर्व वादींचा सल्ला मसलत व माहिती घेवून जबाब दिला आहे. वादी तर्फे मुखत्यारधारक वादी नं.९ यांचे उलटतपासात त्यांनी अनेक ॲडमीशन दिलेले असून त्या रेकॉर्डवर आहेत. सदरचे ॲडमिशन्स वादी नं.७ यास पुसून टाकण्याचा प्रयत्न आहे. याही कारणावरून वादी तर्फे साक्षीदार म्हणून यास तपासण्याची परवानगी देता येणार नाही.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्यात वादीतर्फे वादी नं.२ यांना नि.नं.७८ वरील आदेशान्वये वादीतर्फे पुरावा देण्यास परवानगी दिली होती. परंतू वादी नं २ हे दि २१.१२.१७ मयत झाल्याने त्याच्या ऐवजी वादी नं ७ यांना तपासण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी घेतलेल्या हरकती पाहता सदरच्या हरकती या प्रतिवादींतर्फे यापूर्वी नि.७८ वरील अर्जाच्या कामी घेण्यात आलेल्या होत्या व सदर या सर्व हरकतींचा विचार नि.७८ वरील आदेश करताना करण्यात आला. तद्नंतर नि.७८ हा मंजूर करण्यात आला आहे. वास्तविक प्रस्तुत अर्ज हा केवळ वादी नं.२ हे मयत झाल्यामुळे त्यांच्याऐवजी वादीतर्फे पुरावा सादर करण्यासाठी अन्य वादीला परवानगी मिळावी म्हणून केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील कारण पाहता वादी यास त्यांच्यातर्फे साक्षीदार म्हणून वादी नं.७ श्री.शशिकांत कलगोंडा पाटील यांना तपासण्यास परवानगी देणे गरजेचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करतो:-

| | <u>आदेश</u> | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. | |

सही/-

(विश्वास पां.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.

ठिकाण:-जयसिंगपूर.
दिनांक:-१९/०१/२०१९.